जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAY 2018
तरुण भारत

# विद्यापीठात पहिले कुलगुरू डॉ. पवारांना अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांच्या अर्धपुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये मान्यवरांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन' येथेही डॉ. पवार यांच्या अर्धपुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. भारती पाटील, उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. मानसिंगराज निंबाळकर, प्राचार्य डॉ. बी. एल. पाटील, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. सी. टी. पवार, अशोक साबळे, अनिल वेल्हाळ यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

**मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व पुष्पहार अर्पण**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर आदी.**

जनसंपर्क कक्ष
6 MAY 2018
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अशोक चौसाळकर : विद्यापीठात 'प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स' पुस्तकाचे प्रकाशन

# माणसाचे स्वातंत्र्य हाच मार्क्सचा उद्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कार्ल मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादात द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्यसिद्धान्त; वर्गसंघर्ष व वर्गविहीन समाज या साऱ्यांचा समावेश होतो. माणसाचे स्वातंत्र्य हा कार्ल मार्क्सचा मुख्य उद्देश होता, असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र परिसंवाद सभागृहात शनिवारी दुपारी कार्ल मार्क्सच्या दुसऱ्या जन्मशताब्दीप्रसंगी समाजवादी प्रबोधिनीसाठी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ पाटील यांनी संपादित केलेल्या 'प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे होते.



आदित्य वेल्हाळ

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र परिसंवाद सभागृहात शनिवारी समाजवादी प्रबोधिनीसाठी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांनी संपादित केलेल्या 'प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसाद कुलकर्णी, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, निहाल शिपूरकर यांच्या उपस्थितीत झाले.

डॉ. चौसाळकर म्हणाले, मार्क्स हा तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यासक होता. त्याच्या मते माणूस हा इतिहासाचा कर्ता आहे. तो इतिहासवादीसुद्धा होता.

डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, मार्क्स हा क्रांतिकारक विचार मांडणारा होता; म्हणून त्याला 'प्रेषित' असे संबोधतात. मार्क्सवादाचे विचार लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी म्हणाले, मार्क्सने भांडवलदारांचे गुणदोष दाखवून देत कामगारांचे शोषण कमी करण्याचे काम केले.

प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे म्हणाले, श्रममूल्य वेगाने बदलत आहे, तरी दोनशे वर्षांपूर्वी मार्क्स यांनी मांडलेला सिद्धान्त आजही उपयोगी पडतो.

भालबा विभूते म्हणाले, कामगार चळवळी कमी होत चालल्या आहेत. जो तो भौतिक प्रलोभनांच्या मागे धावत आहे. चौथ्या क्रांतीमध्ये खऱ्या अर्थाने मार्क्सच्या विचारांची गरज भासणार आहे.

गोवा विद्यापीठाचे डॉ. अनिल पडोसी, प्रा. डॉ. आर. एम. म्होपरे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी निहाल शिपूरकर, प्रा. डॉ. एस. एम. भोसले, प्राचार्य जी. जे. ताम्हणकर, प्रा. डॉ. सिंधुदेवी कोरे, प्राचार्य डॉ. ए. एम. महाडिक, अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. टी. एम. भोसले, प्रा. डॉ. एन. बी. जाधव, प्रा. डॉ. यू. एम. मालकर, प्रा. डॉ. ए. के. वावरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
6 MAY 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणसाचे स्वातंत्र्य हा मार्क्सचा मुख्य उद्देश

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ पाटील यांनी संपादित केलेल्या 'प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात हा कार्यक्रम झाला. यावेळी डावीकडून प्रसाद कुलकर्णी, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर व मान्यवर.

'माणसाचे स्वातंत्र्य हा कार्ल मार्क्सचा मुख्य उद्देश होता. कार्ल मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादात अतिरिक्त मूल्यसिद्धान्त, वर्गसंघर्ष, द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद आणि वर्गविहीन समाज या सर्वांचा समावेश होतो', असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र परिसंवाद सभागृहात शनिवारी दुपारी कार्ल मार्क्सच्या दुसऱ्या जन्मशताब्दीप्रसंगी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ पाटील यांनी संपादित केलेल्या 'प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, 'माणसांचे स्वातंत्र्य हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच कार्ल मार्क्स सातत्याने कार्यरत राहिला. मार्क्स हा तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यासक होता. त्याच्या मते माणूस हा इतिहासाचा कर्ता आहे. मार्क्स हा इतिहासवादीसुद्धा होता. हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा मार्क्सवर परिणाम होता, असे काही अभ्यासकांचे मत आहे. हेगेलसह रिकार्डो, फ्रेंच भौतिकवादाचा परिणामही त्याच्यावर असल्याचा दुसरा प्रवाह होता.'

डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, 'मार्क्स हा क्रांतिकारक विचार मांडणारा होता; म्हणून त्याला 'प्रेषित' असेही म्हटले जाते. मार्क्सवादाचे विचार लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे.' याप्रसंगी प्रा. डॉ. एस. एम. भोसले, प्राचार्य जी. जे. ताम्हणकर, प्रसाद कुलकर्णी, प्रा. डॉ. सिंधुदेवी कोरे, प्राचार्य डॉ. ए. एम. महाडिक, अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. टी. एम. भोसले, प्रा. डॉ. एन. बी. जाधव, प्रा. डॉ. यू. एम. मालकर, प्रा. डॉ. ए. के. वावरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAY 2018
Times of India

# University to implement choice-based system this year

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The academic council of Shivaji University, Kolhapur (SUK) has given the nod to implement Choice Based Credit System (CBCS) from the upcoming academic year of 2018-19 for first year BA, BCom and BSc courses.

At the council meeting on Friday, council members gave the green signal to implement the framework created by the university.

Mahesh Kakade, director of board of examinations and evaluation, SUK, told **TOI** that the required infrastructure for the system will be implemented with the help of in-house resources as well as outsourcing it.

Kakade said, "The system needs to be the best. We cannot afford any glitch since it is going to be one of the finest academic changes in recent times. Hence, we will outsource some of the work when required."

According to Kakade, implementation of CBCS in BA, BCom and BSc courses will be applicable for over 1.50 lakh students across Sangli, Satara and Kolhapur districts.

Kakade added, "Semester examination for first year courses from October 2018 will come under the ambit of CBCS. We are already experienced in implementation of CBCS in PG courses. We are sure that adapting the system in large scale won't pose any issue."

An SUK official said that CBCS will provide a flexible learning approach to students. Under CBCS, a student can take interdisciplinary subjects along with their regular courses. For instance, an undergraduate student of science can choose to study arts or commerce subjects if they wish.

Students will be able to opt for courses of their choice and pursue skills to enhance their employability with the help of the new system.

Adaptation of CBCS will ensure seamless mobility of students as well as transfer and mutual recognition of credits across higher education institutions in the country.

## The New System

- Students will be able to opt for courses of their choice and pursue skills to enhance their employability
- Over 1.5 lakh first year students of BA, BCom and BSc will be affected by the change
- SUK already has CBCS for PG courses on its campus
- The SUK will use its own expertise as well as outsource help to implement execution of CBCS

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स

# बीकॉम, एमकॉमच्या अभ्यासक्रमात जीएसटी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठात बी.कॉम. आणि एम.कॉम. अभ्यासक्रमांतर्गत जीएसटीचा समावेश करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. दरम्यान, प्रा. भारती पाटील व डॉ. आर. जी. कोरबू यांची विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषदेवर निवड झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषदेवर दोन सदस्यांची निवड करण्याची प्रक्रिया शुक्रवारी पार पडली. यामध्ये शिक्षक गटातून प्रा. कोरबू यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. महिला गटामध्ये भारती पाटील व डॉ. शर्मिला साबळे यांच्यात निवडणूक झाली. त्यामध्ये पाटील यांना २६, तर साबळेंना ८ मते मिळाली.

बी.कॉम. व एम.कॉम. अभ्यासक्रमात जीएसटी तसेच विद्यापीठात पी.जी. डिप्लोमा इन ई गव्हर्नन्स हा अभ्यासक्रम सुरू करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. बी.ए., बी.कॉम तसेच बी.एस्सी अभ्यासक्रमांना चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टीम लागू करण्याचे यावेळी ठरले. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रमाची रचना, नियमावलीसही मान्यता देण्यात आली. दरम्यान, परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठीची सुधारित नियमावली मान्य करण्यात आली.